0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक १५/१०/२०१२ रोजी प्राप्त अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६९/२०१२/जा.७३२, दिनांक १८/१०/२०१२, ०७/१०/२०१२ व ३०/११/२०१२.

३) या कार्यालयाचे "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/ प्र.क्र.६९/२०१२/जा.७३३, दिनांक १८/१०/२०१२.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांचे दिनांक २७/११/२०१२ रोजी टपामालार्फत प्राप्त अभिवेदन..

५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत सदाशिव भोईर यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

६) बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ चा मालक विकास प्रकाश भोसले यांचे दिनांक १४/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजी प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६९/२०१२/जा.205
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- 15/03/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०२/१०/२०१२ रोजी पोलिस हवालदार/३७५९ अशोक काळू पवार नेमणूक महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, ठाणे सद्या गुन्हे प्रकटीकरण पथकात कामकाज करीत असून त्यांना १३.२५ वाजताचे सुमारास बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, एका बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ मधून चिकनघर येथून शिधावाटपा करीता ताब्यात घेतलेला माल हा काळ्या बाजारात विक्रीसाठी घेऊन जाणार आहेत, अशी बातमी मिळाल्यावरुन लागलीच त्यांनी सदरची बातमी वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. सुनिल पाटील यांना कळविले असता, त्यांनी तात्काळ सहा. पोलिस निरीक्षक श्री. एच.एन.जाधव, सहा पोलिस उप निरीक्षक श्री. गव्हाणे, पोना/१६०१ जे

जी ठोके, पो.ना./६०७२ एस बी सोनावणे, पोना/२३९१ एस जी पाटील, पोना/३५१८ अनुप अरुणोदय कामत, पोकॉ/२४३७ संदिप रामचंद्र बर्वे असे पोलिस कर्मचारी व अधिकारी यांना बोलावून घेऊन त्यांना वरील बातमीचा आशय समजावुन सांगून सदर ठिकाणी काय प्रकार आहे ते पाहून खात्री करुन कायदेशिर कारवाई करणेबाबत कळविले. त्यानुसार वरील अधिकारी व कर्मचारी चिकनघर येथे रवाना झाले. नंतर चिकन घर छत्रीबंगला, कल्याण पश्चिम या ठिकाणी सहा पोलिस निरीक्षक श्री. जाधव यांनी दोन पंचांना बोलावून घेऊन त्यांना बातमीचा आशय समजावून सांगून पंच म्हणून हजर राहणेस विनंती केली असता, दोन्ही इसमांनी पंचांचे काम करण्यास होकार दर्शविल्याने वरील पोलिस पथकाने सापळा लावून बसले असताना १४.१५ वाजताचे सुमारास एक बोलोरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ या टेम्पो चालकास इशारा करुन वाहन बाजूला घेण्यास सांगितले. त्यानुसार वाहन चालकाने वाहन बाजूला घेतले. नंतर लागलीच पंचांसमक्ष टेम्पो चालकास पंच व पोलिसांची ओळख करुन देऊन बोलोरो टेम्पो चालकास बोलोरो टेम्पो झडती घेणार असलेबाबत कळवून टेम्पो चालकास त्याचे नांव विचारला असता, त्याने त्याचे नांव मुकेश परबत पटेल असे सांगितले. पोलिस पथकाने पंचांसमक्ष नमूद टेम्पोची झडती घेतली असता, सदर टेम्पोमध्ये पाठीमागील बाजूस ३८ बाचकी प्रत्येकी सुमारे ५० किलो वजनाचे सफेद व इतर रंगाचे पॉलिथिनचे बाचक्यामध्ये गहू भरलेले मिळून आले.

येणेप्रमाणे वरील टेम्पोमध्ये मिळून आलेल्या गहूबाबत वाहन चालक नामे मुकेश परबत पटेल यास विचारपुस करता, त्याने सदरचा माल हा चिकनघर कल्याण पश्चिम शिधावाटप क्रमांक ३८-फ-९८ या शिधावाटपाचे दुकानातून विकत घेतले आहे असे सांगितले. त्यामुळे सदर गहूबाबतचे कागदपत्रे दाखविणेस सांगितले असता, त्यांनी सदर बाबत कसलेही कागदपत्रे नसलेचे सांगितले आहे. सदर गहू कोठे घेऊन जाणार आहे, याबाबत विचारपुस करता, त्याने सदरचा माल हा पडघा येथील भदाणेगाव जय आनंद फ्लोअर मिल येथे घेऊन जात आहे, असे सांगितल्याने वरील टेम्पो, टेम्पोमधील मालासह ताब्यात घेतले आहे. सदर जप्त मालास पंचांचे व पोलिसांचे सहिचे कागदी लेबले लावले आहेत. नमूद इसमाना पुढील चौकशी कामी ताब्यात घेऊन महात्मा फुले चौक पोलिस ठाणे येथे आणले आहे.

अशाप्रकारे दिनांक ०२/१०/२०१२ रोजी १४:१५ वाजताचे सुमारास छत्री बंगला चिकनघर कल्याण पश्चिम येथून इसम नामे १) मुकेश परबत पटेल व २) शिधावाटप रास्त दुकान क्र. ३८-फ-९८ चे मालक यांनी आपसात संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा गहू अवैधरित्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी शिधावाटप धारकांना शिधापत्रिकेवर रास्त भावाने विक्रीसाठी राखून ठेवलेले गहू हे जीवनावश्यक वस्तू आहे हे माहित असताना सुध्दा आर्थिक दृष्ट्या दुर्बल जनतेची व शासनाची फसवणूक करुन काळ्या बाजारात विक्री करणेसाठी सदर गहू आपल्या कब्जात बाळगून टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ मधून वाहतूक करुन घेऊन जात असताना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची

तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ चा भंग केल्यावरुन महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ११८/२०१२ दिनांक ०२/१०/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | पांढऱ्या रंगाचा बोलोरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ | १ नग | ५,००,०००/- |
| २ | उक्त टेम्पोमध्ये पाठीमागील बाजूस ३८ बाचकी प्रत्येकी सुमारे ५० किलो वजनाचे सफेद व इतर रंगाचे पॉलिथिनचे बाचक्यामध्ये गहू | १९ क्विंटल | १७,१००/- |
| | | एकूण | ५,१७,१००/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती सहा. पोलीस निरीक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, ठाणे यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०६/११/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०६/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २७/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २७/११/२०१२ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १८/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस श्री. एच. एन. जाधव तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ७ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ चा मालक विकास प्रकाश भोसले यांनी उपस्थित राहून यापूर्वी वाचावे क्र. ६ अन्वये टपालामार्फत दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तथापी, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत सदाशिव भोईर यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांनी सुनावणी सायंकाळी ०४:०० वाजता ठेवण्याची दुरध्वनीवरुन विनंती केल्याने सदरची सुनावणी स्थगीत करुन सायंकाळी ०४:०० वाजता ठेवण्यात आली. सायंकाळी ०४:०० वाजताच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत

सदाशिव भोईर यांनी उपस्थित राहून यापूर्वीच वाचावे क्र. ५ अन्वये टपालामार्फत दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे नोकर खिमजी धनजी पटेल हे उपस्थित राहिले. सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत सदाशिव भोईर यांनी त्यांच्या दुकानातील रेशनचा गहू काळेबाजारीने विक्री करीत असताना पोलिसांनी पकडले असल्याची बाब मान्य केली असून याची पुनःवृत्ती होणार नाही याची दक्षता घेऊ असे सांगितले व मुकेश परबत पटेल यांना ते ओळखत नसल्याचे सांगितले. टेम्पोचे मालक यांनी मुकेश पटेल यांना ओळखत नसताना त्यांनी त्यांचा टेम्पो त्याच्या ताब्यात कसा दिला याबाबत विचारले असता, त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. सदर अंतीम सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत सदाशिव भोईर यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यास मिळालेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये दिनांक ०२/१०/२०१२ रोजी पोलिसांनी गहू पकडला असा आरोप त्याच्यावर लावला आहे. परंतू तो पकडलेला गहू त्याच्या दुकानातील शिपधारकांचा नसून तो बजरंग ट्रेडिंग कंपनीचा आहे. पोलिसांनी त्यांना टेम्पो घेऊन जात असताना छत्री बंगला ह्या ठिकाणी ड्रायव्हरला पकडले होते. तो गहू त्यांच्या दुकानातील नसताना सुध्दा त्यांच्या वरती जबरदस्तीने फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामध्ये त्यांची कोणत्याही प्रकारची चुक नसताना सुध्दा त्यांना बळजबरीने ह्यात ढकलण्यात आले आहे. तरी कृपया योग्य तो निर्णय द्यावा, असे नमूद केले आहे.

बोलोरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ चा मालक विकास प्रकाश भोसले यांचे दिनांक १४/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्याच्या मालकी हक्काचे पांढऱ्या रंगाची बोलोरो टेम्पो असून सदरहू वाहन हे त्याच्या नांवे आर.टि.ओ. कार्यालय कल्याण यांचे दफ्तरी नोंदही आहे व सदरहू वाहनाचा क्रमांक एम एच-०५-आर-८२५१ असा आहे. सदरचे वाहन त्याने भाडेतत्त्वावर वापरण्यास दिलेले आहे. परंतू सदरचे वाहन हे आपल्या कार्यालयामार्फत ताब्यात घेतलेले आहे. त्याने ते वाहन भाड्याने दिलेले असून समोरील इसमाने त्याचा गैरवापर केला आहे व त्या बाबीचा त्याच्याशी काहीएक संबंध नाही. सदरहू वाहन हे त्याच्या मालकी हक्काचे असून, सदरहू वाहन हे त्याने बँकेतून हप्तेवर घेतले आहे व सदरहू गाडीवरच त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह होत आहे. त्याला या गाडीच्या व्यतिरिक्त उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सदरहू गाडीचा वापर झाला नाही, तर गाडीचे लोन फेडणे हे शक्य होणार नाही व बँकेचे कर्जाचे हप्ते त्याच्या अंगावर येईल व तो एक गरीब व्यक्ती असून त्याच्या कुटुंबाची सर्वस्वी पालन पोषणाची जबाबदारी त्याचेवरच आहे. आपण कृपया त्याची आर्थिक स्थिती व त्याच्या कुटुंबाची



CONTROLLER OF RATIONING

समस्या लक्षात घेऊन त्याच्या गाडीचा ताबा त्याला परत दिल्यावर सदरहू गाडीचा वापर हा तो स्वत: करीन व तिचा उत्पन्न व उपभोग घेईन याची तो हमी देतो. जोपर्यंत सदरहू गाडीचा फायनल निकाल आपल्या कार्यालयातून लागत नाही, तोपर्यंत सदरहू गाडी तो कोणासही भाडेवर किंवा विकत देणार नाही, याची तो हमी देतो. तसेच सदरहू गाडीचा ताबा मिळणेसाठी आपल्या कार्यालयाचे जे काही फि असेल ती तो भरण्यास तयार आहे व त्यासाठी जो काही दंडाची रक्कम व तसे बॉन्ड वगैरे लागतील ते तो देण्यास तयार आहे व गाडीचा ताबा मिळाल्यावर गाडीची संपूर्ण जबाबदारी त्याची राहिल, अशी तो हमी देतो. तरी त्याच्या गाडीचा ताबा त्याला देण्याची कृपा करावी, अशी विनंती केली आहे.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित श्री. एच. एन. जाधव तपासी पोलिस अधिकारी तथा सहांय्यक पोलिस निरिक्षक यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यात आरोपीताचे कब्जात मिळून आलेला बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-अर-८२५१ बाबत योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०२/१०/२०१२ रोजी महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण येथील पोलिस पथकाने बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ मधून चिकनघर येथून शिधावाटपा करीता ताब्यात घेतलेला माल व काळ्या बाजारात विक्रीसाठी पडघा येथील भदाणेगाव जय आनंद फ्लोअर मिल येथे घेऊन जात असतांना पकडले. बोलोरो टेम्पो चालकास त्याचे नांव विचारला असता, त्याने त्याचे नांव मुकेश परबत पटेल असे सांगितले. पोलिस पथकाने पंचांसमक्ष नमूद टेम्पोची झडती घेतली असता, सदर टेम्पोमध्ये पाठीमागील बाजूस ३८ बाचकी प्रत्येकी सुमारे ५० किलो वजनाचे सफेद व इतर रंगाचे पॉलिथिनचे बाचक्यामध्ये गहू भरलेले मिळून आले. येणेप्रमाणे वरील टेम्पोमध्ये मिळून आलेल्या गहूबाबत वाहन चालक नामे मुकेश परबत पटेल यास विचारपुस करता, त्याने सदरचा माल हा चिकनघर कल्याण पश्चिम शिधावाटप क्रमांक ३८-फ-९८ या शिधावाटपाचे दुकानातून विकत घेतले आहे असे सांगितले. सदर गहूबाबतचे कागदपत्रे दाखविणेस सांगितले असता, त्यांनी सदर बाबत कसलेही कागदपत्रे नसलेचे सांगितले आहे. अशाप्रकारे इसम नामे मुकेश परबत पटेल व शिधावाटप रास्त दुकान क्र. ३८-फ-९८ चे मालक यांनी आपसात संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा गहू अवैधरित्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी शिधावाटप धारकांना शिधापत्रिकेवर रास्त भावाने विक्रीसाठी राखून ठेवलेले गहू हे जीवनावश्यक वस्तू आहे हे

माहित असताना सुध्दा आर्थिक दृष्ट्या दुर्बल जनतेची व शासनाची फसवणूक करुन काळ्या बाजारात विक्री करणेसाठी सदर गहू आपल्या कब्जात बाळगून टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ मधून वाहतूक करुन घेऊन जात असताना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन टेम्पो व त्यामधील १९ क्विंटल गव्हाचा असा मिळून एकूण रुपये ५,१७,१००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त गुन्हयातील आरोपी/अपचारींपैकी अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ ९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत सदाशिव भोईर यांचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, जप्त गव्हाचा साठा त्यांच्या दुकानातील शिधापत्रिकाधारकांचा नसुन तो बजरंग ट्रेडिंग कंपनीचा आहे. तसेच सदरचा गव्हाचा साठा त्यांच्या दुकानातील नसतांना पोलिसांनी त्यांच्यावर जबरदस्तीने गुन्हा दाखल केला असल्याचे नमुद केले आहे. तथापी, दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीच्यावेळी त्यांनी केलेल्या खुलाशात जप्त गव्हाचा साठा त्यांच्या दुकानातील असुन तो काळाबाजाराने विक्री करीत असतांना पोलिसांनी पकडले असल्याची बाब मान्य करुन याची पुनरावृत्ती होणार नाही असे कबुल केले आहे. तसेच त्यांचा नोकर खिमजी धनजी पटेल याने नमुद गुन्हयातील आरोपी व जप्त साठयाचा खरेदीदार मुकेश परबत पटेल याचेशी संगनमत करुन त्यांच्या दुकानातील संलग्न पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचा शासन नियंत्रीत दराचा गव्हाचा साठा हा काळाबाजारीने विक्री केल्याचे सांगितले आहे. यावरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३८ फ ९८ चे प्राधिकारपत्रधारक अनंत सदाशिव भोईर यांनी टपालामार्फत खोटे व बेजबाबदार निवेदन सादर करुन या कार्यालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक पहाता प्राधिकारपत्रधारकास शासनाने नेमुन दिलेली जबाबदारी पार पाडतांना गोरगरीब शिधापत्रिकाधारकांचा त्यांना देय असलेले शिधाजिन्नस देणे बंधनकारक आहे. तथापी, या प्रकरणी त्यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी त्यांच्या ताब्यात असलेला गव्हाचा साठा त्यांच्या नोकराद्वारे काळाबाजारीने विक्री करुन शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणुक करुन विश्वासार्हता गमावल्याचे सिध्द होत आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६९/२०१२/जा.७३३, दिनांक १८/१०/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच नमुद गुन्हयातील जप्त करण्यात आलेला बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ चे मालक म्हणुन विकास प्रकाश भोसले यांचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात ते जप्त टेंम्पोचे मालक असल्याचे सांगुन त्यांचा नमुद गुन्हयाशी काहीही संबंध नसुन सदरचे वाहन हे त्याने भाडेतत्वावर दिले असल्याचे सांगितले. तथापी, सदरचे टेंम्पो त्यांनी भाडेतत्वावर दिले असले तरीही सदर वाहन मालक म्हणुन त्यांच्या ताब्यात अथवा त्यांच्या अधिनस्त असलेल्या चालकाच्या ताब्यात असणे गरजेचे आहे. परंतु सदर प्रकरणी त्यांच्या मालकीचा टेंम्पो हा नमुद



CONTROLLER OF RATIONING HEAD MUN

गुन्हयातील आरोपी तसेच जप्त गव्हाच्या साठयाचे खरेदीदार मुकेश परबत पटेल यांच्या ताब्यात मिळुन आला आहे. टेंम्पोचे मालक हे मुकेश परबत पटेल नामे इसमास ओळखत नसल्याचे त्यांनी सुनावणीचे वेळी सांगितले. तथापी, सदर अनोळखी इसमास त्यांनी टेंम्पो ताब्यात कसा दिला ? याबाबत विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. यावरुन टेंम्पोचे मालक विकास प्रकाश भोसले यांनी मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभुल करणारे निवेदन सादर केले असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. तरी सदर गुन्हा नोंद प्रकरणी टेंम्पोचे मालक यांनी मुकेश परबत पटेल यांना त्यांचा टेंम्पो विनाचालकाचे स्वाधिन केला असल्याने सदर गुन्हयात त्यांचाही प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला बोलेरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेंम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेंम्पो त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टेंम्पोचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेंम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेंम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. II ११८/२०१२ दिनांक ०२/१०/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दिनांक १८/१०/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला बोलोरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टेम्पोची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा टेम्पोचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) बोलोरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ चा चालक मुकेश परबत पटेल
२) बोलोरो टेम्पो क्र. एमएच-०५-आर-८२५१ चा मालक
३) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३८-फ-९८ चे प्राधिकारपत्रधारक
४) जय आनंद फ्लोअर मिल, पडघा, भदाणेगाव चे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दुकान शाखा, का.क्र. १०, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.
५) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.



0008